माहितीचा अधिकार

## राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य खंडपीठ, पुणे यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

तक्रार क्रमांक– १०३७ / २०२३ /सोलापूर

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे-१

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलिय अधिकारी तथा |
| पुष्पक विद्याधर दोशी | सहायक आयुक्त (अन्न) अन्न व औषध प्रशासन , महाराष्ट्र राज्य , सोलापूर. | सह आयुक्त (अन्न) अन्न व औषध प्रशासन , महाराष्ट्र राज्य , ५ वा मजला , सयाजिराव गायकवाड उद्योग भवन, औंध पुणे ७ |

(निर्णय दिनांक- ०६.०६.२०२५ )

तक्रारदार यांचा कलम-१८ अंतर्गत तक्रार अर्ज दिनांक २६.०३.२०२४ रोजी राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त झाला आहे. तक्रारदार यांनी आयोगाचा आदेश पारित होऊन जन माहिती अधिकारी यांनी अद्याप माहिती उपलब्ध करून दिली नाही अशा आशयाची तक्रार केली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (७) नुसार आयोगाचा निर्णय सार्वजनिक प्राधिकरणावर बंधनकारक आहे आणि त्यानुसार सर्व सार्वजनिक प्राधिकरणानी आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(९) नुसार राज्य माहिती आयोग, तक्रारदाराला व सार्वजनिक प्राधिकरणाला आपल्या निर्णयाबाबत तसेच अपिलाच्या कोणत्याही हक्काबाबत कळवील, अशी तरतूद आहे.

सदर तक्रार अर्जाशी संबंधित व्दितीय अपील क्रमांक ३१३५-२०१९- सोलापूर यामध्ये आयोगाने दिनांक ०६.१०.२०२२ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला आहे. यामध्ये तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जावर मुदतीत कार्यवाही केली असल्याने, तसेच अपिल आदेशाची अंमलबजावणी करताना अपिलार्थीस माहिती पुरविली असल्याने आयोगाने सदर द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय पारित केला आहे. सदर वस्तुस्थिती विचारात घेता सदर तक्रार प्रकरणी आयोगाचे कोणतेही स्वतंत्र निर्देश नाहीत.

### आदेश

वरील निर्देशासह तक्रारदार यांचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ पुणे.

तक्रार क्रमांक– १०३७ / २०२३ /सोलापूर 8412/2025

दिनांक- 16/6/2025